इन माय होम

डॉ. अशोक रानडे

**नाद हे ॐकार स्वरूप परब्रह्माचं आदिरूप आहे असं मानलं जातं. विविध प्रकारच्या घंटांचा नाद, तसंच ध्वनी आणि श्रवणशास्त्राचा वापर घरात केल्यामुळे गाताना निर्माण होणारा नाद यांच्या रूपाने संगीततज्ज्ञ डॉ. अशोक रानडे यांच्या घरात जणू त्या परब्रह्माचाच वावर असल्याचं जाणवतं...**



काचेच्या दरवाजांची शोकेस आणि तिच्या पुढ्यातली गाण्यासाठी बैठक...

# नादब्रह्माचा आशीर्वाद...

**● या घरी केव्हा राहायला आलात?**

१९७४ मध्ये आम्ही वांद्रे येथील साहित्य सहवासमधल्या घरी राहायला आलो. त्याआधी आम्ही गिरगावातल्या बनाम हॉल लेनमध्ये राहत होतो. तिथे बाहेरचा बराच आवाज घरात यायचा, पण येथे आल्यानंतर मला गाण्यासाठी आवश्यक असलेली शांतता मिळाली.

**● फर्निचर करताना कुठल्या खोलीत कुठलं फर्निचर करायचं याबाबत कसे निर्णय घेतले?**

घरात वावरायला पुरेशी मोकळी जागा असावी, त्यामुळे फार फर्निचर असू नये, हे आधीच ठरवलं होतं. संगीताच्या अभ्यासासाठी एक वेगळी स्वतंत्र खोली असावी, हे मात्र निश्चित केलं होतं. ही खोली अशी असावी की, जिथे वाद्य, पुस्तकं आणि जुन्या ध्वनिमुद्रित संगीताचा खजिना एकत्र असावा, असाही एक दृष्टिकोन घराची मांडणी करताना होता; पण स्वतःचं गाणं ऐकताना किंवा विद्यार्थ्यांना शिकविताना आणि त्यांचं गाणं लक्षपूर्वक ऐकताना त्यातले बारकावे नीट ऐकू यावेत यासाठी बाहेरचा आवाज घरात येऊ नये, याची काळजी घेणं आवश्यक होतं. तसंच गाताना घरातला आवाज बाहेर जाऊ नये, याचीही खबरदारी घ्यायची होती. त्यामुळे जिथे गायला बसणार, त्याच्या पाठीमागे मला आवाज परावर्तित होणारा असा पृष्ठभाग हवा होता. त्याकरिता काचेचे दरवाजे असलेली पुस्तकाची शोकेस खिडकीला काटकोनात ठेवून तिच्या पुढ्यात गाण्यासाठी बैठक व्यवस्था केली. स्लायडिंग खिडक्यांच्या काचा सरकवून त्या बंद केल्या की तिथे बसून गाताना आपल्या आवाजातले बारकावे आपल्यालाच स्पष्टपणे ऐकू येतात. या आसनासमोरच कॉम्प्युटरसाठी टेबल करून घेतलं. त्यावर ठेवलेल्या कॉम्प्युटरच्या मॉनिटरसाठी आणि मशीनसाठी अॅक्रेलिकच्या पारदर्शक काचेच्या केसेस करून घेतल्या. त्यामुळे आत धूळ जात नाही. या टेबलाच्या खालच्या भागात कॉम्प्युटर स्टेशनरीसाठी ड्रॉवर्स केलेले आहेत, तर या टेबलाच्या डाव्या बाजूला एकाखाली एक असे दोन रॅक्स करून त्यावर म्युझिक सिस्टिम ठेवली आहे. ध्वनिमुद्रित संगीताच्या अभ्यासासाठी आणि जुन्या संदर्भांसाठी डेस्कटॉप कॉम्प्युटरचा वापर करतो, तर रोजच्या कामासाठी खिडकीखालच्या टेबलावर ठेवलेल्या लॅपटॉपचा वापर करतो. व्हॉईस कल्चर शिकविताना लागणारी शरीररचनेची आणि स्वरयंत्रांच्या रचनेची मॉडेल्स तबल्यांच्या रॅकच्यावर असलेल्या कपाटात ठेवली आहेत.

घराच्या मुख्य दरवाजाबाहेरच्या सेफ्टी डोअरचं डिझाईन हे मोकळं आणि मोठं आहे. त्यामुळे आतला मुख्य दरवाजा उघडा ठेवला की वारा आत यायला मदत होते आणि बाहेरून बघितलं तर घरातली स्पेस जाणवते. त्यामुळे या सेफ्टी डोअरचं स्वरूप हे केवळ एक दरवाजाबाहेरचा दरवाजा, एवढंच मर्यादित नाही.

गावाकडे गुरांना चरायला नेताना त्यांच्या गळ्यात वेगवेगळ्या नादांच्या घंटा बांधल्या जातात. त्यामुळे त्या नादांमधल्या फरकावरून गुराखी आपापली गुरं ओळखतात. अशा प्रकारच्या नाद असलेल्या घंटा मला मुंबईत चर्चगेटच्या एका दुकानात मिळाल्या. त्या मी लिव्हिंगरूममधून स्टडीरूममध्ये जायच्या दरवाजावर बांधल्या आहेत. वारा आला की त्यांचा कर्णमधुर ध्वनी घरभर घुमतो. त्यामुळे मन प्रफुल्लित होतं.

परदेशी विद्यार्थी माझ्याकडे अनेकदा गाणं शिकण्यासाठी येतात. त्यांना बसण्यासाठी पाश्चिमात्य खुर्च्यांची व्यवस्था केली आहे, पण मला भारतीय बैठकच बरी वाटते. त्यामुळे माझ्यासाठी मी अशीच बैठक व्यवस्था ठेवली आहे.

**● पुस्तकं आणि वाद्यं यासाठी काय सोय करून घेतली?**

तानपुरे आडवे ठेवले, तर त्यांच्या तारांवर भार येतो. त्यामुळे ते वाजवताना ज्या प्रकारे धरले जातात त्याच दिशेत, म्हणजेच उभेच ठेवावे लागतात. तसे ते भिंतीला टेकवून ठेवताना घसरू नयेत यासाठी स्टँड्स करून घेतले आहेत. त्या बाजूला तबले आणि हार्मोनिअम ठेवल्या आहेत. वाद्यं पटकन काढता आणि ठेवता यावीत यासाठी बंद कपाटामध्ये न ठेवता ही अशी रचना करून घेतली आहे. पुस्तकांसाठी केलेल्या शोकेशमध्ये पुस्तकं विषयवार मांडून ठेवली आहेत. त्यामुळे हव्या त्या विषयाची पुस्तकं चटकन मिळायला मदत होते. नेहमी लागणारी शब्दकोशासारखी पुस्तकं खिडकीखालच्या टेबलावर उघड्यावरच मांडून ठेवल्यामुळे ती चटकन हाताशी मिळतात.

**● फ्लोअरिंगसाठी काय निवडलं?**


स्वच्छ करायला सोपं आणि कमी खर्चात होणारं असं व्हिनाईल फ्लोअरिंग घरासाठी निवडलं.

**● रंगाचं व्यवस्थापन कसं केलं?**

घरात दिवसाचा प्रकाश चांगला असल्यामुळे त्याचा उपयोग करून घरातलं वातावरण आनंददायी ठेवण्यासाठी उजळ रंगछटांचा वापर केला.

**● प्रकाशयोजना करताना कुठल्या प्रकारचे दिवे उपयोगात आणले?**


आम्हाला पिवळा प्रकाश देणारे दिवेच अधिक



सकाळी झोपाळ्यावर बसून चहा प्यायला बरं वाटतं...

# टच...

सकाळ
शनिवार,
११ ऑक्टोबर २००८



वाद्य, पुस्तकं आणि जुन्या ध्वनिमुद्रित संगीताचा खजिना एकत्र असणारी स्टडी रूम...

आवडतात. मला आणि माझ्या पत्नीला दोघांनाही वाचनाची खूप आवड आहे. वाचन करतानाही हेच दिवे बरे वाटतात. स्वयंपाकघरात काम करताना मात्र पत्नीला पांढरा प्रकाश देणाऱ्या ट्यूबलाईट अधिक सोयीस्कर वाटतात.

**● घरात झाडं कुठली लावली आहेत?**

तुळस, फायरबॉल, पावडर फफ, सदाफुली अशी झाडं लावली आहेत. फुलं देणाऱ्या झाडांपेक्षा हिरवाईनं नटलेली झाडं डोळ्यांना अधिक सुखावत असल्यामुळे तीच झाडं अधिक आहेत.

**● घरातली तुमची आवडती जागा कुठली?**

सकाळी झोपाळ्यावर बसून चहा-कॉफी घ्यायला बरं वाटतं, तर संध्याकाळी बैठकीच्या खोलीत उन्हं डोकावतात तेव्हा भारतीय बैठकीवर बसायला अधिक निवांत वाटतं...


(**मुलाखत आणि छायाचित्रं** : मनोज अणावकर)
email : anaokarm@yahoo.co.in



वाद्यं पटकन काढता-ठेवता यावीत यासाठी रचना... तानपुऱ्यांचे स्टॅंड्स

## अशोक रानडे यांच्या घराची वैशिष्ट्यं

या घराचं सगळ्यात पहिलं वैशिष्ट्य म्हणजे गाण्याच्या दृष्टीने सोयीस्कर व्हावं यासाठी एकॉस्टिकली, अर्थात ध्वनी व श्रवण क्रियाशास्त्रानुसार स्टडीरूमची केलेली रचना. खोलीतला आवाज खोलीबाहेरच्या वातावरणात विरून जाऊ नये आणि खोलीतच राहावा, तसंच बाहेरचे आवाज खोलीत येऊ नयेत यासाठी अशी रचना केली जाते. स्टुडिओ, नाट्यगृह, चित्रपटगृह अशा ठिकाणी आतला आवाज बाहेर जाऊन बाहेरच्यांना त्रास होऊ नये किंवा बाहेरचा आवाज आत येऊन आतल्यांच्या श्रवणात खंड पडू नये, यासाठी अशी रचना केली जाते. तसाच विचार या घरात केलेला आढळतो. त्यामुळेच संगीत साधना करताना आसनाच्या मागच्या बाजूला आवाज परावर्तित करणारे काचेच्या शोकेससारखे पृष्ठभाग येतील याची काळजी घेतली आहे. त्याचबरोबर आवाज मुखावाटे बाहेर पडल्यानंतर ज्या दिशेने पुढे सरकणार, त्याच्या काटकोनात असलेल्या दिशेत खोलीच्या खिडक्या असून त्याच्या स्लायडिंगच्या काचा बंद केल्या की गाताना निर्माण होणारे नाद खोलीतच राहू शकतील आणि बारीक नादही ऐकू येऊ शकतील, अशी व्यवस्था केली आहे. मोठ्या आणि मोकळ्या डिझाईनचं सेफ्टी डोअरही वैशिष्ट्यपूर्ण आहे. गाणं शिकायला येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांकरिता असलेल्या सोफा सेटबरोबरच भारतीय बैठकही असल्यामुळे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य बैठक व्यवस्थेतून निर्माण होणारी संमिश्र बैठक व्यवस्था घरात आहे.



...तर संध्याकाळी उन्हं खात भारतीय बैठकीवर बसायला अधिक निवांत वाटतं